**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
==================================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
------------------------------------------------------------------
**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**
==================================================================

# संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिक विचार

प्रा. डॉ. श्रीहरी चव्हाण
(मराठी विभाग) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय राणीसावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी

प्रस्तावना:

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखले जाते. या भूमीमध्ये अनेक संत होऊन गेले. संतांची एक मालिका दिसून येते म्हणून या ठिकाणी असे म्हणावे वाटते "संत महात्म्याची भूमी ही माझी मराठवाड्याची लई पुण्यवान माती" या संतांमध्ये वेगवेगळ्या अनेक जातीतील संत होऊन गेले. संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला. त्यानंतर अनेक संतानी वारकरी संप्रदायाची परंपरा पुढे चालू ठेवण्याचे कार्य अनेक संतांनी केलेले दिसून येते. त्यामध्ये प्रामुख्याने संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास, संत मीराबाई, संत जनाबाई, संत गोरोबाकाका, संत सावता माळी, सेनान्हावी आशा अनेक संतांनी महाराष्ट्रातील सर्व सामान्य लोकांना सत्त मार्ग दाखवण्याचे कार्य केले. महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता अज्ञानी, अडाणी होती. समाजामध्ये जातीय भेदभाव मोठ्या प्रमाणामध्ये पसरलेला होता. जाती-जातीमध्ये मानसे विभागलेली होती. समाजामध्ये उच्च निच असा भेदभाव पसरलेला होता. एकमेकांविषयी द्वेष मत्सर पसरलेला होता.त्यामुळे सामाजिक विकास थांबलेला होता. समाजामध्ये अनिष्ट रूढी परंपरा, अंधश्रद्धा, मोठ्या प्रमाणात होती. देव, देवता यांचे प्रॉब्लय मोठ्या प्रमाणामध्ये असल्यामुळे समाज दिशाहीन झालेला होता. "मानव सेवा हीच खरी ईश्वरसेवा" ही मूल्य समाजामध्ये रुजवण्याचे काम संतांनी केलेले आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाजाला उच्च विचार देण्याचे कार्य या महान संतांनी केले . समाजामध्ये समानता निर्माण करण्याचे काम केले.

संत तुकाराम जीवन परिचय:

तुकाराम हे संत एकनाथाच्या नंतरचे भागवत संप्रदायातील श्रेष्ठ संत व कवी असून सतराव्या शतकामध्ये होऊन गेले त्यांच्या जन्म आणि मृत्यू निश्चित वर्षांमध्ये झाला याबद्दल अभ्यासकांमध्ये मतभेद असलेले दिसून येतात. सर्वसाधारणपणे इ.स1606 ते 1649 असा त्यांचा जीवनकाळ मानला जातो. आळंदी मध्ये देहू या गावी जन्म झाला. तुकारामांच्या जीवनाबद्दलची पारंपारिक माहिती आणि दंतकथा इतक्या एकवटल्या आहे की, त्या वगळून त्यांच्या जीवनाबद्दलची अस्सल माहिती मिळवणे अगदी अवघड आहे. तुकारामाच्या जीवन वृत्तांताचा आधार म्हणजे महिपती ताराबादकरने "भक्तलीलामृत" हा ग्रंथ तुकाराम गुप्त झाल्यानंतर एकशे चाळीस वर्षांनी म्हणजेच इ.स 1774 मध्ये हा ग्रंथ लिहिला गेला.तुकारामाचे सर्वाधिक तपशीलवार पण निराधार असे चरित्र आहे. येथे संत म्हणूनच पाहिलेले आहे.

तुकाराम यांच्या चरित्राचे आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे त्याचे स्वतःचे अभंगच होय. त्यातील काही अभंगात त्यांच्या आयुष्यातील प्रत्यक्ष घटनांचा उल्लेख आहे. या घटनांवरून त्यांच्या आंतरिक संघर्षाची व बाहेरच्या कठीण परिस्थितीची कल्पना येते. तुकारामाचे अभंग हे वेळोवेळी प्रसंगानुरुप रचणा दिसून येते. या अभंगातून त्यांच्या आयुष्यातील विविध परिस्थिती, त्या त्या वेळेच्या उत्कट भावना व विचार अभिव्यक्त झालेली आहेत. तुकारामांच्या चरित्राची आणखी एक अस्सल साधन म्हणजे बहिणाबाई ही त्यांच्या समकालीन

कवित्रीच्या काव्यातून आलेला त्यांचा जीवनवृ तांतहोय. बहिणाबाई ही तुकारामाच्या आयुष्यांची प्रत्यक्ष रसग्रही साक्षीदार होती. तुकारामांच्या समकालीन इतर अनेक कवीच्या काव्यातूनही तुकाराम हा अध्यात्मिक प्रणेता असल्याचे कितीतरी संदर्भ आलेले आहेत. त्यांच्या वडिलांचे नाव बोल्होबा आणि आई कनकाई असून तुकारामाला सावजी नावाचा एक मोठा भाऊ होता. त्यांचे घर वारकरी संप्रदायाचे होते. वडील धार्मिक वृ त्तीचेतर भाऊ अतिशय विरक्त होते. व्यवसायाची जबाबदारी तुकारामावर होती. तुकाराम यांनाही संसार होता. पत्नी व मुले असून तुकारामाची दोन लग्न झाली. मात्र प्रपंचाचे सुख तुकारामांना फारसे लाभले नाही. त्यांच्या वडीलाचे निधन झाले व लगेच त्यांच्या आईचे निधन झाले. धंदा फारसा चालेनासा झाला. महाराष्ट्रामध्ये फार मोठा दुष्काळपडला त्याचा परिणाम तुकारामाच्या व्यवसायवर आणि प्रपंचावर परिणाम झाला.

अभंगातून सामाजिक विचार :

समाजात जाती, वर्ण, संपत्ती, यामुळे अहंकार कसा वाढतो आणि हा दाभिकपणा कसा नष्ट होतो, यांचे वर्णन त्याने आपल्या अभंगातून केले आहे. संत तुकारामांना गुरूच्या कृपेने त्यांना भगवंतांचे दर्शन झाले आणि जगाच्या कल्याणासाठी त्यांनी जीवन समर्पित केले. संत तुकाराम यानी देवाला आपल्या अभंगात असे म्हणतात की, देवाला भक्ताची गरज आहे कारण तो स्वतःचे कौतुक करू शकत नाही. जेव्हा शरीर एक साधन बनते तेव्हा ते कौतुक करते, आश्चर्य करते आणि देवारा ते हवे असते

संत तुकारामांचे जीवन शांतता आणि भक्तीचा सुंदर संगम होता. ते फक्त तेच ज्ञान देत असत जे स्वतः आचरणात आणतात तेच त्यांच्या बोलण्यात ठामपणा होता.

जग पाहता हे लटके सकाळ l
मज कोठे मायाजाळ दावी देवा ll

संत तुकाराम महाराज म्हणतात, जग हे मिथ्या आहे. समाजाचा त्याग करून जीवनातील परमतत्वाचा साक्षात्कार होणे शक्य नाही. समाजाच्या विविध रूपावरच तुकारामाची अभंग रचना उभी आहे. तुकाराम याने माणसाच्या वैयक्तिक चारित्र्याच्या शुद्धतेबरोबरच त्यांची सामाजिक चारित्र्यही शुद्ध असावे असा आग्रह धरला. देव देवता त्यांची अर्थसून्य, पूजा, उपासना पद्धती अंधश्रद्धा, देवदेवतांच्या नावाने चालणारे ढोंग आणि अन्याय, जातीव्यवस्थेमुळे वाढणारी विषमता, अशा अनेक सामाजिक दोषांवर त्यांनी प्रहार केला. माणसातील सात्विकता, सुजाणता, चांगुलपणा जागा केला. पण त्याचबरोबर त्याची दृष्ट बुद्धी, अन्यायकारक वृत्ती, आंधळी भक्ती यांचाही नाश केला पाहिजे अशा भावनेने तुकारामांनी अभंग चरना केली आहे. १७ व्या शतकात राजकीय दृष्टीने पाहता समाज परावलंबी झालेला होता. त्याची घडी मुसलमानी आक्रमणांनी विस्कटली होती. पण समाजमन कणखर राहावे, निर्मळ भक्तीचा आधार त्याला मिळावा आणि बहुजनसमाजाला आध्यात्माचा मार्ग खुला व्हावा यासाठी तुकारामांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील नैतिक उन्नती व्हावी यासाठी तळमळीने कार्य केले. सर्वसामान्य माणूस त्यांच्या अभंगांनी प्रभावित झाला. संत तुकारामांच्या साहित्याने प्रभावित होऊन भारताचे शिल्पकार महादेव गोविंद रानडे यांनी तुकारामांचे स्तवन केले आहे. ह.भ.प. ल. रा. पांगारकर यांची तुकाराम भक्ती तुकाराम चरित्राप्रमाणे प्रसिद्ध आहे. आचार्य अत्रे म्हणतात. ज्याचे घरी नाही गाथा। त्याच्या कमरेत घाला लाथा ।।

तसेच ज्याला उत्तम व प्रासादिक भाषा लिहावयाची असेल त्याने तुकारामाचा अभ्यास केला पाहिजे. थोर साहित्यिक मं.बा. सरदार, दि. पू. चित्रे, साने गुरूजी इत्यादिंनी तुकारामांच्या अभंगांना साहित्यातील मौलिक रत्न म्हटले आहे. तुकारामांसारखा द्रष्टा कवी विरळाच! संत तुकारामांच्या साहित्याबद्दल 'तुकाराम' या पुस्तकात चंद्रकांत पाटील म्हणतात, सतर्कता, साशंकता, आत्म-संघर्ष इत्यादी गोष्टींचे मूळ, जगण्याची प्रक्रिया आणि साहित्याचे अतूट नाते, व्यक्ती आणि समाजातील संतुलित नात्याचा शोध, जीवांपासून अजीवांपर्यंतची एकसंघता अशा असंख्य मोलाच्या गोष्टी संत तुकारामांच्या साहित्यातून जाणवतात. तुकारामांची अभंग रचना साडेचार हजार एवढी आहे त्यात कुठेही दुबोधता नाही. मुद्दाम प्रयत्न नाही. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, प्रापंचिक जीवनाला स्पर्श करणारी अभंगवाणी मानवी जीवनाचे अमोल तत्त्व सांगणारी आहे. म्हणूनच त्यांचे चाहते विदेशातही सापडतात. फादर डलरी हे त्यांपैकीच एक रेव्हरंड एडवर्ड यांनी त्यांच्या काही अभंगाची भाषांतरे इंग्रजी भाषेत केली आहेत. मराठी भाषेचा आणि तुकारामाच्या अभंगाचा हा बहुमान आहे. भगवान येसूच्या वचनाशी कित्येक लेखकांनी त्यांच्या अभंगाची तुलना केली आहे. संत तुकारामांनी ज्या काळात अभंग रचना केली तो काळ अतिशय धामधुमीचा होता. तुकारामाच्या जन्माच्या वेळी सबंध भारत मोघलांच्या अधिपत्याखाली होता. जहांगीर आणि शहाजहानने इ.स. १६३६ मध्ये अहमदनगरचे राज्य जिंकून घेतल्यावर संपूर्ण महाराष्ट्र मुसलमानी सत्तेच्या आमलाखाली आला होता. महाराष्ट्रात इ.स. १६४६ मध्ये शिवरायांची सत्ता स्थापन झाल्यानंतर मराठे आणि मोगल यांच्यात युद्धक्षेत्र सुरू झाले. या सर्व हालचालींचे परिणाम महाराष्ट्रातील जनतेवर होत होते. युद्धामुळे राजकीय अनागोंदी माजली होती. समाज अस्वस्थ झाला होता. मुसलमानांनी हिंदुंच्या धार्मिक भावना दुखावल्या होत्या. अशावेळी तुकारामांच्या शिकवणुकीतून शेतकऱ्यांचे धार्मिक पुनरूज्जीवन होत होते. १६२९-३० मध्ये भारताच्या पश्चिमेला आणि दक्षिणेला भयंकर दुष्काळ पडला. संपूर्ण दख्खन उष्णतेने भाजून निघाले होते. दोन वर्ष पाण्याचा थेंबही पडला नव्हता. दुष्काळामुळेसारी खेडी होरपळून निघाली होती. त्याचे वर्णन तुकारामाच्या अभंगांमध्ये दिसून येतात.

"आता काय खावे कोणीकडे जावे l गावात रावे कोण्याबळे l
कोपला पाटील गावीचे हे लोक l आता मज भीक कोण घाली ll

गरीब रयतेची अशी वाईट अवस्था झाली होती. ते तुकारामाना पहावेना. लाखो मानसे अन्न पाण्यावाचून तडफडून मरत होती. अशा भीषण दुष्काळाच्या काळात धनाने श्रीमंत असणारी माणसे मनाने दारिद्र्य होती, ते लांबून पहात होते. अशा भयावत परिस्थितीत आधार देणारे संत तुकाराम साक्षात ईश्वराचाचा अंश लोकांना दिसत होते. त्याचा अनुभव सावरायला धावले. त्यालाच संत म्हणतात म्हणून मानव जातीमध्ये तुकाराम सदैव वंदनीय आहे.

खालील अभंगांमधून संत तुकारामानी समाजातील अनिष्ट रूढी परंपरा बदल सांगतात.

"नाही देवापाशी मोक्षाचे गांठोळे l अनणूनी द्यावे हातीं l
इंद्रियांचा जय साधुनिया मन l निर्वीषय असे कारण असे तेथे l
उपवास पारणी अक्षराची आटीं l सत्कर्म शेवटी आसे फळ" l

संसारा मधील नाना व्याधीनी तापाने पाळणाऱ्या माणसांच्या जीवाची त्या व्याधीतून सुटका होणे म्हणजे मोक्ष होय. आपल्या भारतीय परंपरेत धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहे. माणूस जन्माला आल्यावर जो काही भलेभुले काम करतो त्यावर स्वर्गाचे सुख आणि नरकाच्या यातना भोगाव्या लागतात. अशी कल्पना आपल्या भारतीय परंपरेत सांगितली आहे. स्वर्ग आणि नर्क भोगल्यावरही त्याची सुटका होत नाही. देवाच्या कृपेने मोक्ष मिळतो ही मानवाची भाबडी कल्पना आहे. यावर संत तुकाराम मार्मिक भाषिक करतात,

"इंद्रियांचा जय साधुनी मन । निर्विषय कारण असे तेथे" ।

माणसाला सुखाने जगायचे असेल तर त्याने वासना, विकार, काम, क्रोध, लोभ या विकारावर विजय मिळविला पाहिजे. वासनाचे लगाम आपल्या हाती भक्कमपणे आवळले पाहिजेत.

" मन करा रे प्रसन्न सर्वसिद्धीचे कारण"

ढोंगीपणा नाटकीपणा करून समाजाची दिशाभूल करणे, त्यांचे शोषण करणे, स्वर्गाचा मोक्ष दाखवतो किंवा चमत्कार करणे, तुम्हाला मुक्ती देतो म्हणणे हे चूक आहे. संत तुकाराम सांगतात या भूतलावर अजून कोणालाही मुक्ती मिळालेली नाही. मुक्तीचा विचार जिवंतपणे तुम्ही करू नका. जीवन सुंदर आहे ते आनंदाने जगा आणि जगू द्या हीच खरी मुक्ती आहे. समाजात टिळा लावणारे टोपी घालून अंगाला चंदन लावणारे व समाजाची रात्रदिन फसवणूक करून आपले पोट भरणारे साधू निर्माण झाली आहेत. समाजाची दिशाभूल करतात अज्ञानाचा फायदा घेता.

"सत्य तोचि धर्म । असत्य तेची कर्म ।।"

माणसाच्या जीवनामध्ये सत्य विचाराचे आचरण झाले पाहिजे. सत्यवर्तन म्हणजे मानवतावाद होय. परपीडा, परनिंदा, परद्रव्य, परणारी यापासून माणसाने चार हात लांब असली पाहिजे. तरच आपल्या जीवनाची उन्नती होते. गर्व अहंकार अभिमान माणसाला संपून टाकतो. प्रत्येक माणसाने इमानेइतबारे कष्ट करून प्रपंच केला पाहिजे. कधीही आपल्या जीवनात लबाडी करू नये. गरजवंताला दान केली पाहिजे. आपले वतन हे नेहमी सत्य विचारावर आधारित असले पाहिजे.

"मढे झाकूनिया करिती पेरणी । कुनबियाचे वाणी लवलाहे"।
तयापरी स्वहित आपुले । जयासी लाभला नरदेह ।
ओटीच्या परीस मुठीचे ते वाढे । जयासी कैवाडे स्वसहिताचे ।
नाही काळ सत्ता हाती । जाणते हे गुंती उगविती ।
तुका म्हणे पाही आपली सूचना । करतो शहाणा मृत्यूलोकी' ।।

संत तुकाराम या अभंगातून सामान्य माणसाला काळ आणि वेळ याचे महत्त्व विशद करून सांगतात. आणि विशेषता काळाबरोबर जी माणसं चालतात ते व्यवहार आणि परमार्थ या दोन्ही क्षेत्रात यशस्वी ठरतात. तुकाराम आपल्या विचार सहज सोप्या भाषेत जन लोकांना सांगतात. माय बापू सावध होऊनी एका मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे काय केव्हा झडप घालेल हे कोणालाही माहीत नाही म्हणून सावध होऊन एका मी काय बोलतोय नीट ऐका वेळ निघून गेल्यावर काही उपयोग नाही मानव जन्म एकदाच आहे म्हणून ईश्वराचे चिंतन केले पाहिजे. संत तुकाराम आपल्या अभंगातून जमिनीत पेरणाऱ्या शेतकऱ्याचे उदाहरण देऊन सांगतात

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे त्याला आपण बळीराजा म्हणतो तो उदार मनाचा आहे स्वतःच्या पोटाची तो कधीच काळजी करत नाही पण जगाच्या पोटाची काळजी करतो त्याच्या जीवनात किती मोठे दुख आले तरी तो जण लोकांना दाखवत नाही समाधानच्या डोळ्यात अश्रू येते म्हणून त्याची चिंता वाढते.

अशा प्रकारे संत तुकारामाचे एकूण अभंग रचना म्हणजे प्राचीन वाङ्मयातील जनजागृतीचे कार्य करणारी परिवर्तनवादी अशी महत्त्वाची अभंगरचना आहे. त्यांचे अभंग केवळ नुसते अभंग नसून तत्कालीन समाजाच्या उन्नतीसाठीचे मानमुक्तीचे ते एक आंदोलन आहे म्हणून तर मराठी संत साहित्यात संत तुकारामाच्या अभंगावरती प्राचीन काळापासून ते आजतागायत अनेकांनी भाष्य केले आहे. त्यांच्या अभंगाचा मराठी संत साहित्यात जेवढा अभ्यास केला गेला तेवढा अभ्यास दुसऱ्या कोणत्याही संताच्या अभंगाचा झालेला नाही. म्हणून तर मराठी संत साहित्यात वारकरी संप्रदायातील भागवत धर्माचा कळस म्हणजे संत तुकाराम आहेत. संत तुकारामांनी सर्वसामान्य जन माणसाला मानवतेची शिकवण देण्यासाठी मुक्तछंदात्मक अभंग या काव्यरचनेचा वापर केला. भक्तीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला एकात्मतेची शिकवण देवून समतेच्या वाटेवर आणण्यासाठी अभंग या काव्यप्रकरणाचे हत्यार वापरले आणि सहज सोप्या भाषेत स्वअनुभवातून सुंदर मानवी जीवन जगण्याचे सूत्र सांगितले. आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठी संत तुकारामांनी अभंग या मुक्तछंद काव्यप्रकाराची निर्मिती केली.

संदर्भ ग्रंथ:-

1 संत तुकारामाची गाथा:- संपादक डॉ. गोपाराव गोविंद बेणारे
2. सुखाचा परिमळ -डॉ. निर्मलकुमार फडकुले
3. संत तुकाराम मुक्तचिंतन- डॉ. कालिदास गुडदे
4. सरदार गं. बा संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती महाराष्ट्र साहित्य परिषद 1962
5 पेंडसे श .दा साक्षात्कारी संत तुकाराम